# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०१/०३/२०१९
## दि.२८/०२/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १०२/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | आदित्य चव्हाण,वय-१९ वर्षे,रा.मु.पो.तळेगांव-ढमढेरे,ता.शिरुर,जि.पुणे |
| **आरोपी** | कारवरील अज्ञात चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०२/२०१९ रोजी दुपारी १३/३० ते १३/४५ वा.चे दरम्यान जीवन ज्योत हॉस्पीटल समोर तेल्याची मोरी जवळ,जुना खराडी जकात नाका,पुणे-नगर रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र अब्रार जावेद बागवान,वय-१९ यांचेसह तळेगांव ढमढेरे येथुन मोटार सायकलवरुन पुण्याकडे जात असताना,नमुद वेळी व ठिकाणी त्यांचे पाठीमागुन येणा-या कारवरील चालकाने भरधाव वेगाने येवुन,निष्काळजीपणे धोकादायकरित्या त्याची कार चालवुन अचानक यु-टर्न घेत असताना,सदरची कार फिर्यादी यांचेसमोर आडवी आल्याने,मोटार सायकलला सदर कारचे पुढच्या बाजुचे बंपर लागल्याने फिर्यादी यांची मोटार सायकलला धडक लागुन ती खाली पडुन,त्यांचेसोबत असलेला अब्रार जावेद बागवान हा खाली पडुन,तो गंभीर जखम होऊन उपचारादरम्यान मयत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. एस.एस.रासकर ९०८२१९६०८० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे २०२/१९,भादविक ३०६ |
| **फिर्यादी** | राहुल बिस्वास,वय-३२ वर्ष,रा.स्टेशन रोड शास्त्री बीड,तिरोडा,गोदिया |
| **आरोपी** | सचिन बबन कासिद,वय-२९ वर्षे,रा.स्वप्नलोक सोसायटी,पापडे वस्ती,फुरसुंगी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०२/२०१९ रोजी व त्यापुर्वी स्वप्नलोक सोसायटी,बी/७०२,रेल्वे लाईन जवळ,पापडे वस्ती,फुरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची बहीण बहिण श्वेता अरुण बिश्वांस,वय-३०,रा.कॅम्प निर्मला निवास दस्तुर रोड,कॅम्प,पुणे हिस सचिन याने ऐनवेळी लग्नांस नकार दिल्याने,तीने नैराश्यात जावुन स्वतः गळफास लावुन घेवुन आत्महत्या केली असुन,श्वेता हिचे मृत्युस सचिन कासिद हा कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. के.एस.लोंढे ८९७५०२०५०० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे ६३/१९,भादविक ४२०,४५१,३८०,१२०(ब),३४,माहिती व तंत्रज्ञान का.क. ४३(अ)(ड)(ई)६६(ड) |
| **फिर्यादी** | रौफ मणियार,वय-४३,रा.शिवाजीनगर,पुणे |
| **आरोपी** | १.वकील नुरदीन खान,वय-२२,रा.राजस्थान २.दिलसाद हरूण खान,वय-२५,रा.राजस्थान (अटक) व इतर एक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०२/२०१९ रोजी ०३/१५ वा. डेक्कन,जंगली महाराज रोड,प्रतिक हॉटेल जवळील बँक ऑफ इंडीया एटीएम मशीन मध्ये ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी बँकेचे ग्राहक असल्याचे भासवुन,ॲक्सिस बँकेचे एकुण तीन एटीएम कार्ड वापरून,एटीएम मशीन त्यांचेशी जोडलेले संगणक व इंटरनेट यांचा स्वीच बंद करून,त्यामध्ये स्वतःचे फायदयाकरीता छेडछाड करून,इतर व्यक्तीचे एटीएम / डेबीट कार्ड स्वतःचे आहे असे भासवुन,एकुण १६ हजार रूपये एटीएम मधुन काढुन बँक ऑफ इंडीयाची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. दिपक लगड ९८२३३८२३३३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे १२७/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४० वर्ष,रा.रामनगर,येरवडा,पुणे |
| **आरोपी** | १.मोबाईलधारक २. बँकेचे खातेधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/१२/२०१८ ते दि.१८/१२/२०१८ रोजीचे कालावधीत ऑनलाईन माध्यमाव्दारे फिर्यादी यांचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना व्यवसायाचे व्यवहार करण्याकरीता एटीएम खरेदी करावयाचे असल्याने त्यांनी एटीएम कार्ड मशिन बसविणेसाठी साईटवर ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर,यातील नमुद मोबाईलधारक इसमाने फिर्यादी यांचेशी संपर्क साधुन,त्यांना रजिस्ट्रेशन फी, प्रोसेसिंग फी भरण्याचे आमिष दाखवुन,त्यांना एकुण ८०,३५०/- रुपये भरण्यास भाग पाडुन व त्यानंतर फिर्यादी यांचेशी संपर्क न साधता,फिर्यादी यांची ऑनलाईन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) के.बी.बालवडकर ९४२१२६२०७४ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ११६/१९,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३३,रा.कॅम्प,पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी इसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०१/२०१९ सकाळी १०/१५ ते १०/३० वा.चे दरम्यान एसबीआय बँकेचे शाखा, गोळीबार येथील एटीएम मधुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे एटीएम कार्डाचे नविन पीन जनरेट करण्यासाठी गेले असताना, यातील नमुद अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना नविन पीन जनरेट करण्यासाठी अडचणी येत असल्याने,फिर्यादी यांनी अनोळखी इसमाची मदत घेतली. त्यावेळी सदर इसमाने फिर्यादी यांचे बँकेचा खाते नंबर टाकायला लावुन,ओटीपी नंबर आल्यानंतर एटीएम कार्ड स्वॅप करायला लावुन,फिर्यादी यांना नविन पीन नंबर टाकायला लावुन,फिर्यादी यांचे हातामधील असणारे एटीएम कार्ड चेक परस्पर चेक करून,त्यांना दुसरे एटीएम कार्ड देवुन,फिर्यादी यांचे खात्यामधुन १७ हजार रूपये काढुन घेवुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.व्हि.गुजर ९६५७०६८८१० |

**प्रेसनोट** दिनांक २५/०२/२०१९

**छायाचित्र स्पर्धा** "पोलीस इन ॲक्शन नागरीकांची सेवा आणि सुरक्षितेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर विनामुल्य छायाचित्र स्पर्धेबाबत.

पुणे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या संकल्पनेतून १. प्रेस/ प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार ३. पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी त्यांचे कुटूंबिय या गटांकरीता "पोलीस इन ॲक्शन - नागरीकांची सेवा आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर **विनामुल्य छायाचित्र** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेकरीता हौशी छायाचित्रकार या गटांमध्ये कोणीही नागरिक सहभागी होवु शकतो.

सदर स्पर्धेकरीता प्रथम क्रमांक - रोख ५००० रू व शिल्ड, द्वितीय क्रमांक, - रोख ३००० रू व शिल्ड, तृतीय क्रमांक - रोख २००० रू व शिल्ड व उत्तेजनार्थ २ बक्षीसे देण्यात येणार आहेत.

प्रवेशिका http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळावर उपलब्ध असून फोटो (इमेज) वरील दिलेल्या संकेत स्थळावर **ऑनलाईन** पाठवावेत.

**स्पर्धेसाठीचे नियम व अटी-**

१. प्रत्येक स्पर्धकाने जास्तीत जास्त ५ इमेज JPG फॉरमॅटमध्ये ३०० DPI 5 MB साईजचे ओरीजनल व स्वत काढलेल्या इमेज असाव्यात. इमेजवर कोणत्याही प्रकारचे वॉटरमार्क, लोगो, चिन्ह नसावे
२. दिनांक २५/०२/२०१९ रोजीची ही मुदत दि.१२/०३/२०१९ पर्यंत वाढविली असुन दि.१२/०३/२०१९ पर्यंत प्रवेशिका व फोटो नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील
३. निवड झालेले फोटोग्राफ्स हे आयोजक आपल्या प्रदर्शनासाठी व माहिती पुस्तीकेसाठी वापरु शकतील.
४. इमेज पाठविण्यासाठी http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळाचा वापर करावा. सदरचे संकेतस्थळ **रजिस्ट्रेशन केल्यानंतरच** या स्पर्धेत भाग घेता येईल.
५. प्रत्येक स्पर्धकाने त्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.
६. मोबाईल किंवा स्मार्ट फोन ने काढलेली छायाचित्रे सुध्दा स्पर्धेत पाठविता येतील.
७. फोटोग्राफ निवडीसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

**छायाचित्र स्पर्धेसाठी पुणे शहरातील १. प्रेस/प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार, ३. पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबिय असे गट आहेत. हौशी छायाचित्रकार गटात सर्व कॉलेजचे प्रिन्सीपल,व्याख्याते, कॉलेज विद्यार्थी, शिक्षकवृंद, सर्व पत्रकार, उत्सुक व इच्छुक नागरीक यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. असे पुणे पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.**

**अधिक माहितीसाठी- संपर्क अधिकारी-**

१. श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, पुणे शहर.- ८३२९८०४८३६




# Police in Action

## for Service & Security of People

Pune Police









### Photography Contest!

Open to All!

Participate, in one of three groups:

1. **Amateur/ Hobby Photographers**
2. **Police officers, staff & members of their families**
3. **Press/ Professional Photographers**

Prizes in each Group!

1st: **Rs. 5,000**
2nd: **Rs. 3,000**
3rd: **Rs. 2,000**
Two more consolation prizes

**Entry Free!**

Last Date Extended ...
**12 March 2019**

To take part & know more, go to
**www.pixlent.com/punepolicephotocontest**

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर